# GREEN LAWNS HIGH SCHOOL, WARDEN ROAD

MARATHI TERMINAL EXAMINATION : 2023 - 2024

विषय : - मराठी

दिनांक :१६ – १० –२०२३ इयत्ता : ९ वी अ/ब/क.

दिवस : सोमवार वेळ : २ तास गुण : ८०

INSTRUCTIONS : 1. This paper comprises of two sections . section a and Section b.
2. section a and section b answers must be written on the Answers sheet itself.

---

**SECTION A (40 )**

**प्रश्न १. (अ) खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : गुण १०.**

एमिल झेटोपेक हा झेकोस्लोव्हाकियाचा खेळाडू . १९५२ साली त्याने हेलसिंकीचे मैदान गाजवले . तेथे त्याने ५,००० मीटर धावणे व मरेथोन या लांब पल्ल्याच्या शर्यतीत नवीन विक्रम केले व नवा इतिहास घडवला. जगातील एक 'मानवी रेल्वे इंजिन ' अशी झेटोपेकने ख्याती मिळवली. यामुळे जगातील सर्व लोकांना झेटोपेकबद्दल तर अभिमान वाटलाच ; पण त्याचबरोबर झेकोस्लोव्हाकिया देशाबद्दलही त्यांच्या मनात आदर निर्माण झाला .

आफ्रिकेतील इथियोपियाचा अबेबे बिकिला या खेळाडूने तर अनवाणी पायाने मेरेथोन -लांब पल्ल्याची शर्यत जिंकली ! एवढे मोठे अंतर त्याने २ तास १५ मिनिटात काटले. फेनी बँकर्स या स्त्री खेळाडूने तर १९४८ साली ऑलिपिकचे मैदान दणाणून सोडले. १०० व २०० मीटरच्या शर्यतीत प्रथम क्रमांक मिळविला. भारतात हॉकीच्या स्पर्धेत अनेक वर्षे अजिंक्यपद टिकवले. सुप्रसिद्ध भारतीय हॉकी खेळाडू ध्यानचंद यांचे नाव कित्येक वर्षे जगात सर्वांच्या जिभेवर नाचत होते . ऑलिंपिकच्या मैदानावर खेळाडू खेळत असतात , तेव्हा खेळाडूंना पराक्रमाचा व प्रयत्नवादाचा संदेश देणारा ध्वज डौलाने फडकत असतो . त्या ध्वजावरील पाच खंडाची पाच वर्तुळे समतेचा व विश्वबंधुत्वाचा संदेश जगाला देत असतात ; तर त्याच्या शेजारीच क्षुद्र विचारांचा अंधकार घालवणारी ज्योत तेवत असते .

**कृती १. ( आकलन )**

**१ . कोणी ते लिहा : गुण २**

(अ) ' मानवी रेल्वे इंजिन 'अशी ख्याती मिळवली : ----------------

(ब) अनवाणी पायाने मेरेथोन शर्यत जिंकली : ----------------------

**२. कोण ते लिहा :** **गुण २**

(अ) १९४८ साली ऑलिंपिकचे मैदान दणाणून सोडणारी : ----------------

(ब) सुप्रसिद्ध भारतीय हॉकी खेळाडू : -----------------------------

**कृती २. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :** **गुण २**

१. ऑलिंपिक ध्वजाकडून मिळणारा संदेश कोणता ?

२. पाच खंडांच्या वर्तुळाकडून मिळणारा संदेश कोणता?

**कृती ३. विरुद्धार्थी शब्द लिहा :** **गुण २**

( प्रकाश , कुप्रसिद्ध , नवीन, ओळख, लांब )

१.सुप्रसिद्ध २. जवळ ३. जुने ४. अंधकार

**कृती ४ . खालील प्रश्नांचे उत्तर दोन ते तीन वाक्यात लिहा:** **गुण २**

१. आपल्या देशात ऑलिंपिक पदक मिळविलेल्या खेळाडूंची नावे सांगा.

**प्रश्न २. खालील कवितेच्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :** **गुण १०**

| |
|---|
| व्यायाम आरोग्यदायी मित्र \| हे ध्यानी ठेवावे सूत्र \|<br>आळस वैरी मानिला सर्वत्र \| सर्वतोपरी \|\|<br>व्यायामे वाढे प्रतिकारशक्ति \| स्वावलंबनाची प्रवृत्ती \|<br>व्यायामे अंगी वाढे स्फूर्ति \| कार्य करण्याची \|\| |

कृती १. ( आकलन )

१. खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा : गुण २

(अ). व्यायामाने प्रतिकारशक्ती वाढते . ------------------

(ब). व्यायामाने स्नायू अशक्त होतात . -------------------

२. शब्दसमूहांबद्दल एक शब्द लिहा : गुण २

(अ). एका अंगाने केलेला विचार : ----------------

(ब). स्वतःची कामे स्वतः करणारा : ---------------------

कृती २. कवितेतील पुढील शब्दांचे अर्थ लिहा : गुण २

१. मित्र २. सशक्त ३. वैरी ४. सात्विक

कृती ३. खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तीन ते चार ओळीत लिहा : गुण ४

१. व्यायामाचे महत्व म्हणजेच व्यायामाचे फायदे तुमच्या शब्दात लिहा.

२. व्यायाम न करण्याचे तोटे कवितेच्या आधारे लिहा.

**प्रश्न ३.(अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा: ( कोणतेही ६ ) गुण ६**

१. ग्रेट इंडियन पेनिनशूला रेल्वे धावण्याच्या मुहूर्ताचा दिवस व साल कोणते ?

२. ईश्वराची पवित्र पावले कोठे उमटलेली असतात ?

३. ऑलिंपिक सामन्याच्या निमिताने वाढीस लागणाऱ्या भावना कोणत्या आहेत?

४. मुंबई प्रांतात रेल्वे असावी असा उठाव प्रथम कोणी केला ?

५. पाया रचणे याचा अर्थ काय आहे ?

६. 'ऑलिंपिक व्हिलेज' वसवण्याची कल्पना कोठे आणि कोणत्या साली मांडण्यात आली?

७. ग्रेट इंडियन पेनिनशूला रेल्वे धावलेली ठिकाणे कोणती होती ?

**प्रश्न ३.(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा : गुण ६**

१. प्रत्येक खेळाडूने जास्तीत जास्त -------------------- होण्याचा प्रयत्न केला पाहिजे.
( विशाल , उच्चता , गतिमान )

२. बोरघाटाचे काम चालले असतानाच मुंबई ---------------------चा रेल्वे प्रवास ज्यारीने चालू झाला.
( ठाणे , पुणे , खोपोली )

३. क्रीडेच्या क्षेत्रात --------------- नाही , धर्मभेद नाही की वर्णभेद नाही.
(आपुलकी , समता , जातीभेद )

४. खंडाळा पुण्याच्या दरम्यान खडकी आणि -------------- अशी दोनच स्टेशने ठेवण्यात आली.
( तळेगाव , मालेगाव , शिलेगाव )

५. जेसी ओवेन्स हा अमेरिकेच्या यशाचा मोठा ------------------- ठरला .

( चित्रकार , क्रीडापटू , शिल्पकार )

६. पुणे ते मुंबईचा रेल्वे प्रवास अवघ्या ------------- तासांत व्हायचा .

( सोळा , अठरा , पंधरा )

**प्रश्न ४. (अ) वारकरी संप्रदायरुपी इमारत उभे करणारे संत लिहा :** **गुण ४**

१. पाया रचणारे संत : ----------------------

२. कळस चढवणारे संत : -------------------

३. भिंती उभारणारे : -------------------------

४. खांब चढवणारे : -------------------------

**प्रश्न ४. (ब) पुढील शब्दांचे अर्थ लिहा : (कोणतेही ४.)** **गुण २**

१. आवार २. नामांकित ३. निरुपण ४. माळका ५. साळसूद
६. असामी

**प्रश्न ४. (क) वाक्प्रचार व अर्थ लिहा: ( कोणतेही २ )** **गुण २**

१. आटापिटा करणे : -
२. फळा येणे :-
३. अचंबा वाटणे :-

## SECTION B

प्रश्न ५. (अ): खालील अधोरेखित शब्दांचे समानार्थी शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा: गुण ३

१. वाघ हा वन्य प्राणि आहे.
२. पावसानंतर आभाळ निरभ्र होते.
३. नृत्य स्पर्धेत मला पहिले इनाम मिळाले .

प्रश्न ५ .(ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा: गुण ३
(असमाधान, मोठा, अस्वस्थ, अमान्य, अप्रत्यक्ष, स्तुती, गैरसोय, अधोगती)

१. निंदा X २. प्रगती X ३. मान्य X ४. समाधान X

५. छोटा X ६. स्वस्थ X

प्रश्न ५. (क) खालीलअधोरेखितशब्दांचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा: गुण ३

१. माझ्यकडे एक जनावर आहे.

२. माझ्या शाळेच्या बाजूला संग्रहालय आहे.

३. समुद्राच्या किनारी बंगले आहेत.

प्रश्न ६. (अ) खालील वाक्यातील काळ ओळखा: गुण २

१. अखेर मुहूर्ताचा दिवस जाहीर झाला.

२. जनक मंदिरात जातो.

प्रश्न ६. (ब) . खालील दिलेल्या वाक्यांचा प्रकार ओळखा : गुण ३

१. आज सोमवार आहे .

२. आज सुट्टी आहे का ?

३. " चला अभ्यासाला बसा "

प्रश्न ६. (क) खालील वाक्यातील विशेषण व प्रकार ओळखा : गुण २

१. खेळाचे मैदान विशाल आहे .

२. मुंबईला नव्या इमारती बांधताहेत.

प्रश्न ७. खालील दिलेल्या कोणत्यही एका विषयावर पत्रलेखन करा :(कोणतेही १) गुण ६

१. विध्यार्थी प्रतिनिधी ( as student representative) या नात्याने तुमच्या शाळेतील स्टेशनरीसाठी (for your school stationery) स्टेशनरी सामानाची (stationery material) मागणी करणारे पत्र ( शालेय वस्तू मागणी पत्र ) मा. व्यास्थापक भरत स्टेशनरी मार्ट, विनायक नगर , दादर (पूर्व) – ४०००२६ यांना लिहा.

OR

२. तुमच्या मित्राचा दहावीच्या परीक्षेमध्ये पहिला क्रमांक आला म्हणून त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

प्रश्न ८. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा : (कोणतेही १) गुण ८

१. माझा आवडता खेळ

मुद्दे : (आपल्या जीवनात खेळाचे महत्व – खेळ कोणकोणत्या प्रकारचे आहेत

माझा आवडता खेळ कोणता – मला खेळायला का आवडते –

खेळ आपल्याला काय काय शिकवितो – खेळामुळे आपल्याला काय

फायदा मिळतो )

२. मी चित्रकार झालो तर -----------

मुद्दे : ( चित्रकार का व्हावेसे वाटते – प्रेरणाशक्ती कशी मिळाली – धेय्य गाठल्यावर काय करणार – चित्रप्रदर्शन भरवणार – चित्रशाळा काढणार सुंदर चित्रे काढणार – मुलांना चित्रकलेचे शिक्षण – राजा रवि वर्मासारखी प्रसिद्धी – देशाचे नाव – उत्तम चित्रे – देशभक्तांची व महान व्यक्तींची चित्रे )

३. माझा आवडता लेखक :

मुद्दे : (आवडत्या लेखकाचे नाव - ते लेखक का आवडतात – लेखकाचे कार्य – लेखकाची जीवनशैली – लेखकांनी लिहिलेली पुस्तके )

प्रश्न ९. खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : गुण १०

“ज्यांच्यापाशी आवश्यकतेपेक्षा जास्त जमीन आहे, त्यांनी निराधार आणि भूमिहीन लोकांना स्वत:हून जमिनीचे दान करावे . आपल्या देशातील ही ‘विषमता’ आपण जर प्रेममार्गाने नष्ट केली नाही तर एक दिवस असा येईल की आपल्या देशात अपराधी लोकांच्या बरोबरच निरपराध लोकांच्या देखील रक्तांच्या नद्या वाहतील.”

सुमारे चाळीस वर्षापूर्वी आमच्या ‘विनोबा भावे’ यांनी हा इशारा दिला होता . ज्यांची गणना भारताचे ‘आधुनिक संत’ म्हणून केली जाते . त्याच विनोबाजींनी ‘भूदान चळवळ’ उभी केली. सुमारे साडेतेरा वर्षे संपूर्ण भारतभर पायी फिरून हजारो खेड्यातून पंचेचाळीस लाख एकर जमीन मिळवली आणि भूमीहीनाना त्या जमिनींचे वाटप केले. यालाच ‘ निष्काम कर्मयोग’ असे म्हणतात .

विनोबंजींचा शिक्षणाबाबतचा दृष्टीकोनही कौतुकास्पद होता. ‘पुस्तकी’ शिक्षणापेक्षा ‘व्यावसायिक’ शिक्षणाला त्यांनी जास्त महत्व दिले.

“माणसाला स्वत:चे आयुष्य सार्थकी लावायचे असेल तर लोकांचा उद्धार करा”, हा मंत्र विनोबाजीनी दिला. महात्मा गांधीजींच्या प्रेरणेतून तयार झालेले विनोबाजी आपल्या भारतासाठी एक वरदान ठरले आहेत.

प्रश्न १. खालील प्रश्नांची एका वाक्यात लिहा : गुण ४

१. भारताचे आधुनिक संत म्हणून कोणाची गणना केली जाते?

२. पुस्तकी शिक्षणापेक्षा कोणत्या शिक्षणाला आचार्य विनोबा यांनी महत्व दिले?

३. विनोबांनी कोणती चळवळ उभी केली?

४. आचार्य विनोबांनी कोणता मंत्र दिला आहे?

प्रश्न २. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा : गुण २

१. महात्मा गांधीजींच्या प्रेरणेतून तयार झालेले विनोबाजी या ------------- एक वरदान ठरले आहेत.

२. भूमीहीनाना त्या संपूर्ण त्या जमिनीचे वाटप केले यालाच ------------ असे म्हणतात.

प्रश्न ३ . खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा: गुण २

१. सुमारे तीस वर्षापूर्वी आमच्या ‘विनोबा भावे’ यांनी हा इशारा दिला होता.

२. विनोबा भावे सुमारे साडेतेरा वर्षे संपूर्ण भारतभर पायी फिरले.

प्रश्न ४. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा: गुण २

( आवश्यक , विषमता , गाव , दिवस )

१. समता x २. शहर x ३. रात्र x ४. अनावश्यक x